**पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे**

# मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,

**पौड रोड, पुणे- ३८**

---

## सांस्कृतिक विभाग

## (अहवाल-2023-24)

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाकडून वर्षभर नियमितपणे भारतीय समाज जीवनातील थोर महात्म्यांची जयंती, पुण्यतिथी निमित्त अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला जातो. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. आजितदादा पवार तसेच आदरणीय शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. शासनादेशानुसार वाचन प्रेरणा दिन,संविधान दिन, मराठी राजभाषा दिन इत्यादी  दिनविशेष साजरे केले जातात.  तसेच विद्यार्थ्यांना विविध नृत्य, नाटक, रांगोळी, मेंदी, वकृत्व,निबंध लेखन, पोस्टर प्रेसेंटेशन इत्यादी कलांच्या  आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी प्रोत्साहित केले जाते.

दि.18 जुलै 2023 रोजी महाविद्यालयात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री माननीय अजित दादा पवारसाहेब यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी विविध महाविद्यालयातील 25 स्पर्धकांनी सहभाग नोंदविला स्पर्धेचा  निकाल पुढीलप्रमाणे-

**कनिष्ठ महाविद्यालय** :

**प्रथम क्रमांक :** सोनाली ओव्हळ, मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड, पुणे.

**द्वितीय क्रमांक :**समरिन शेख, विष्णूजी शेखुजी सातव हायस्कूल व जुनिअर कॉलेज  वाघोली.

**वरिष्ठ महाविद्यालय** :

**प्रथम क्रमांक :** सूरज शिराळे, मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौड रोड, पुणे.

**द्वितीय क्रमांक :** सायली आरुडे, आयुर्वेदिक संशोधन केंद्र निगडी. व

संजीवनी राठोड, मामासाहेब मोहोळ महाविद्यालय पौड रोड, पुणे.

**तृतीय क्रमांक :** वैष्णवी भोसले, फार्मसी महाविद्यालय हडपसर

या वकृत्व स्पर्धेसाठी डॉ. शैलेश त्रिभूवन व उपप्राचार्य प्रा. तारा पवार यांनी परीक्षक म्हणून कार्य केले.

22 जुलै 2023 रोजी माननीय अजितदादा पवारसाहेबांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेतील स्पर्धकांच्या स्वागतासाठी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते. 05 सप्टेंबर 2023 रोजी शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी अध्यापनाचा अनुभव घेतला. 7 सप्टेंबर 2023 रोजी कृष्ण जन्माष्टमी व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त ग्रंथदिंडीचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रांगणात ग्रंथरुपी हंडी बांधून ती फोडल्यानंतर विद्यार्थ्यांना ग्रंथ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मा. अभंग सर व कर्मचारी वर्ग हजर होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद नोंदविला 4 ऑक्टोबर 2023 रोजी महाविद्यालयात भोंडल्याचे आयोजन करण्यात आले होते. पारंपारिक पोशाखात सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी भोंडल्याचा आनंद घेतला. 2 ऑक्टोंबर 2023 रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 15 ऑक्टोबर 2023 रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कवितेचे समूहवाचन करण्यात आले. मराठी विभागातर्फे महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. दीलपाक तुषार यांनी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले होते. मराठी विभागातर्फे काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांबरोबर अनेक प्राध्यापकांनी काव्यवाचनाचा आनंद घेतला. प्राचार्य डॉ. महिंद्र अवघडे यांच्या मार्गदर्शनातून ग्रंथालय व मराठी आणि सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नवरात्रीनिमित्त महाविद्यालयाच्या सर्व महिला प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थिनीनी नऊ दिवस प्रत्येक दिवशी एकाच रंगाचे पोशाख परिधान करून या सणाचा आनंद घेतला. 15 सप्टेंबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने टीकाराम जगन्नाथ महाविद्यालय येथे सांस्कृतिक समन्वयक कार्यशाळेचे आयोजन केले होते. महाविद्यालयातून प्राध्यापक डॉ. शोभा तितर व प्रा. नैतिक मोरे यांनी या कार्यक्रमासाठी सहभाग नोंदविला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या स्वररंग 2023 या स्पर्धेत महाविद्यालयाचा यश चांडक हा मेंदी स्पर्धेत सहभागी झाला होता.

14 डिसेंबर 2023 रोजी “शांतता पुणे वाचत आहे” या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांनी एक तास शांततेत वाचन करण्याचा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना वाचण्याची आवड निर्माण होईल असे साहित्य यावेळी वाचून घेण्यात आले.दि.5 फेब्रुवारी ते 10 फेब्रुवारी 2024 या कालावधीत सांस्कृतिक विभागाने विविध

स्पर्धात्मक उपक्रमाचे आयोजन केले होते. चारोळ्या, कविता, शेरोशायरी स्पर्धा, चित्रकला, मेंदी स्पर्धा,नाट्य अभिनय मिमिक्री स्पर्धा, गीत गायन  स्पर्धा. पाककला स्पर्धा. नृत्य स्पर्धा इ. या स्पर्धेचा अहवाल स्वतंत्र पणे दिलेला आहे.

20 फेब्रुवारी 2024 रोजी शिवजयंती सोहळा व ग्रंथदिंडी कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनातून करण्यात आले. यावेळी लाल महाल ते  मामासाहेब मोहोळ महाविद्यालयापर्यंत विद्यार्थ्यांनी शिवज्योत मिरवणुकीच्या माध्यमातून  शिवाजी राजांच्या विचारांचा जागर केला. पौड रोड येथील हेवन चौकापासून महाविद्यालयापर्यंत शिवज्योत आणि शिवचरित्रपर ग्रंथांची मिरवणूक ढोल, लेझीम, ताशा या पारंपरिक वाद्यांच्या गजरात पारंपरिक पोशाखात काढण्यात आली. महाविद्यालयात शिववंदना आणि पोवाडा गायनाचा  कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी श्री. नितीन भोसले यांनी पोवाडा गायन केले.

दि.20 मार्च,2024  रोजी महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कोथरूड येथे करण्यात आले होते. तसेच पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी “सोडवणूक” या नाट्यप्रयोगाचा सर्वांनी आस्वाद घेतला. मा. डॉ.महेश झगडे(Ex IAS) मा. प्रधान सचिव,  महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते शैक्षणिक, कला, क्रीडा क्षेत्रातील पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानस सचिव व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे आधिसभा सदस्य अँड. संदीप कदम साहेब यांची उपस्थिती होती. पारितोषिक वितरण कार्यक्रमानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी समूह नृत्य, रॅप म्युझिक इ. कार्यक्रमाचे सादरीकरण केले.